**ठळक बातम्या**

- राज्यातल्या २३ नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी शांततेत मतदान, सर्व ठिकाणी उद्या मतमोजणी

- जी राम जी विधेयकामुळे गावखेड्यांच्या सर्वांगीण विकासाला मोठा हातभार लागेल, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांचा विश्वास

- व्हॉट्सॲप इतर उपकरणांशी जोडण्याच्या प्रक्रियेतल्या कमजोर दुव्यामुळे सायबर हल्ले होण्याची शक्यता सीईआरटीकडून व्यक्त

आणि

- १९ वर्षांखालच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत उद्या भारत-पाकिस्तान आमनेसामने

**<><><><><>**

राज्यातल्या २३ नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या अध्यक्ष आणि सदस्यपदांसाठी, तसंच विविध नगरपंचायतींमधल्या १४३ सदस्य पदांसाठी आज शांततेत मतदान झालं. निवडणूक आयोगानं दिलेल्या आकडेवारीनुसार दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ४७ टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाची नोंद झाली. या सर्व जागा, तसंच २ डिसेंबर रोजी मतदान झालेल्या २६३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींची मतमोजणी उद्या होणार आहे.

**<><><><><>**

करुणा, सहिष्णुता, परस्पर आदर आणि सामूहिक जबाबदारी ही मूल्यं केवळ भूतकाळातले आदर्श नाहीत, तर एका मजबूत आणि सुसंवादी आधुनिक जगासाठी आवश्यक पाया आहेत, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. त्या आज तेलंगणात हैदराबादमध्ये ब्रह्माकुमारी शांती सरोवराच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. विकसित भारतासाठी आधुनिक शिक्षणाची मौलिक ज्ञानाशी आणि नवोन्मेषाची पर्यावरणीय जबाबदारीशी सांगड घालायला हवी, असं मत

त्यांनी मांडलं. अध्यात्माचा मार्गदर्शक प्रकाश संपूर्ण मानवतेला योग्य मार्ग दाखवू शकतो यावर त्यांनी भर दिला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसामची राजधानी गुवाहाटी इथं गोपीनाथ बारदोलोई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नव्या टर्मिनलच्या इमारतीचं उद्घाटन, तसंच बारदोलोई यांच्या ८० फूट उंचीच्या पुतळ्याचं अनावरण केलं. आसामच्या विकासात  आज पुन्हा एकदा एक नवा अध्याय जोडला जात आहे, अशी ग्वाही मोदी यांनी यावेळी दिली. हा फक्त आसामच्या नाही, तर संपूर्ण ईशान्येच्या विकासाचा उत्सव आहे, असं ते म्हणाले.

तत्पूर्वी, प्रधानमंत्री मोदी यांनी पश्चिम बंगाल मधल्या नादिया जिल्ह्यातल्या राणाघाट इथं सुमारे ३२०० कोटी रुपयांच्या दोन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी आणि उदघाटन केलं. भाजपाचं सरकार पश्चिम बंगालमधल्या विविध क्षेत्रांमध्ये संपर्क वाढवण्यासाठी प्रयत्नशील असून बंगालच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी यावेळी दूरध्वनीच्या माध्यमातून उपस्थितांना संबोधित करताना केलं. कार्यक्रमस्थळी दाट धुकं आणि कमी दृश्यमानता असल्यानं प्रधानमंत्र्यांचं हेलिकॉप्टर हेलिपॅडवर उतरू शकलं नाही, त्यांना कोलकत्ता विमानतळावर परतावं लागलं.

**<><><><><>**

विकसित भारत जी राम जी विधेयकाचा फायदा फक्त शेतकरी आणि कष्टकऱ्यांनाच होणार नाही, तर गावखेड्यांच्या सर्वांगीण विकासाला याचा मोठा हातभार लागेल, असा विश्वास केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज व्यक्त केला. नवी दिल्ली इथं चौधरी चरण सिंह पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते.

***होल्ड… बाईट- शिवराज सिंह चौहान***

आगामी अर्थसंकल्पासाठी कृषी क्षेत्रासाठीच्या सूचना मंत्रालयानं मागवल्याची माहिती त्यांनी दिली, तसंच विविध योजना राबवण्याच्या दृष्टीनं शेतकरी, तज्ञ आणि कृषिशास्त्रज्ञांना एकत्र आणण्यासाठी चिंतन शिबिरं स्थापन केल्याची बाबही त्यांनी अधोरेखित केली.

**<><><><><>**

भारताचं परराष्ट्र धोरण पाश्चात्य विचारांच्या पलीकडे जाऊन आपल्या संस्कृतीवर आधारित असायला हवं, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज

मांडलं. पुण्यात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय पुस्तक महोत्सवाच्या एका सत्रात ते बोलत होते. रामायण आणि महाभारत ही केवळ धार्मिक पुस्तकं नसून जागतिक राजकारणाचे धडे देणारे उत्तम मार्गदर्शक आहेत, असं प्रतिपादन त्यांनी केलं. रामायणात श्रीरामांनी विविध शक्तींना एकत्र आणून केलेली मजबूत युती आजही विविध देशांना मित्रराष्ट्रांसोबत संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रेरणादायी आहे, असं ते म्हणाले.

तत्पूर्वी, सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला डॉक्टर जयशंकर यांनी संबोधित केलं. विकसित भारताचं परराष्ट्र धोरण महत्त्वाकांक्षी, दीर्घकालीन आणि क्षितीज विस्तारणारं हवं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जागतिक पातळीवर आर्थिक आणि राजकीय प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल झाले असून अनेक नवी सत्ताकेंद्रं तयार झाली आहेत. त्यामुळं जागतिक पातळीवर भारताचं स्थान बळकट करण्यासाठी अधिकाधिक देशांना सोबत घेण्याची गरज आहे, असं मत त्यांनी मांडलं.

**<><><><><>**

भारताची इलेक्ट्रॉनिक्स निर्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या ८ महिन्यांत ३१ अब्ज डॉलर्सवर पोहोचल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. एका इंग्रजी दैनिकाचा दाखला देत समाजमाध्यमावर त्यांनी आज ही माहिती दिली. हे क्षेत्र चालू आर्थिक वर्षात भारतातल्या सर्वात वेगाने वाढणाऱ्या ३० निर्यात क्षेत्रांपैकी एक असून ही वाढ गेल्या वर्षीच्या तुलनेत ३८ टक्क्यांनी जास्त असल्याचं ते म्हणाले. या वाढीमुळे रोजगार, कौशल्य आणि तंत्रज्ञान देवाणघेवाणीला चालना मिळत असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

व्हॉट्सअॅप इतर उपकरणांशी जोडण्याच्या प्रक्रियेतल्या कमजोर दुव्यामुळे व्हॉट्सअॅप खात्यांवर सायबर हल्ले होण्याची शक्यता असल्याचा इशारा सीईआरटी या भारताच्या सायबर सुरक्षा संस्थेनं दिला आहे. या कमजोर दुव्याला 'घोस्ट पेअरिंग' असं नाव देऊन यासंदर्भात संस्थेनं मार्गदर्शक सूचना जारी केल्या. व्हॉट्सअॅपचं खातं एखाद्या उपकरणाशी जोडताना पडताळणी न करता पेअरिंग कोड्स वापरून सायबर हल्लेखोर व्हॉट्सअॅप खात्यांचं पूर्ण नियंत्रण मिळवू शकतात, यासाठी पासवर्ड किंवा सिमकार्ड बदलण्याची गरज लागत नाही, अशी भीती यात व्यक्त करण्यात आली आहे. यात

वापरकर्त्यांना एखाद्या विश्वासातल्या व्यक्तीकडून फोटो आणि त्यासोबत लिंक असा मेसेज येतो. ती लिंक बनावट फेसबुक वापरकर्त्याच्या प्रोफाइलची असते आणि तो मजकूर पाहण्यासाठी ‘व्हेरिफाय’ करावं असा संदेश येतो. इथं व्हॉट्सॲपच्या फोन नंबरद्वारे लिंक करायच्या फीचरचा वापर करून सायबर हल्लेखोर व्हॉट्सॲप खातं हॅक करतात आणि वापरकर्त्याचे फोटो, व्हिडिओ, संदेश यासह सर्व गोष्टी ते बघू शकतात. हे टाळण्यासाठी ओळखीच्या व्यक्तीकडून आलेल्या संशयास्पद लिंक्सवरही क्लिक करू नये, किंवा व्हॉट्सॲप, फेसबुकसारख्या दिसणाऱ्या कोणत्याही बाहेरच्या संकेतस्थळावर आपला फोन नंबर घालू नये, अशी सूचना सीईआरटीनं केली आहे.

<><><><>

गगनयान मोहिमेतल्या अंतराळवीरांना सुखरुप जमिनीवर परत आणण्यासाठी आवश्यक असलेल्या ड्रोग पॅराशूटच्या चाचण्या इस्रोनं यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. गेल्या २ दिवसात चंदीगडमध्ये या चाचण्या झाल्या. यानानं पृथ्वीच्या कक्षेत प्रवेश केल्यानंतर अंतराळवीर असलेली कॅप्सूल स्थिर करण्यात आणि या कॅप्सूलचा वेग कमी करण्यात ड्रोग पॅराशूट महत्त्वाची भूमिका बजावतं.

<><><><>

सिरियातल्या इस्लामिक स्टेट गटावर काल तीव्र हल्ले केल्याची माहिती अमेरिकेनं दिली आहे. अमेरिकेच्या सशस्त्र दलांवर सिरियात झालेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून हे हल्ले केल्याचं अमेरिकेचं म्हणणं आहे. लढाऊ विमानं, हेलिकॉप्टर्स आणि तोफांच्या सहाय्यानं मध्य सिरियात ७० पेक्षा जास्त ठिकाणं लक्ष्य केल्याची माहिती अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं दिली. यात पूर्व सिरियात आयसिसचे किमान ५ जण ठार झाल्याचं, सिरियन ऑब्जर्वेटरी फॉर ह्यूमन राइट्सनं म्हटलं आहे. आयसिसच्या अड्ड्यांवर अमेरिकेनं जोरदार हल्ला चढवल्याचा दावा अमरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे.

<><><><>

युक्रेननं रशियाच्या हद्दीत दीर्घ पल्ल्याच्या ड्रोनचा मारा केल्यावर रशियानं ओदेसा इथं केलेल्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र हल्ल्यात ८ जणांचा मृत्यू झाला, तर २७ जण जखमी झाले. प्रत्युत्तरादाखल युक्रेननं डागलेल्या ड्रोनने रशियाची युद्धनौका, ओखोट्निकचा वेध घेतल्याचं युक्रेनच्या लष्करप्रमुखांनी सांगितलं. रात्रभर चाललेल्या या ड्रोन हल्ल्यांमध्ये

रशियाच्या अनेक लष्करी तळांवर तसंच औष्णिक केंद्रांवर हल्ले चढवल्याचं युक्रेननं म्हटलं आहे.

**<><><><><>**

१९ वर्षांखालच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत उद्या अंतिम फेरीत भारतासमोर पाकिस्तानचं आव्हान असणार आहे. काल जालेल्या उपांत्य सामन्यात श्रीलंकेला हरवून भारतानं अंतिम फेरीत प्रवेश केला. पावसामुळं कालचा उपांत्य सामना २० षटकांचा झाला. श्रीलंकेनं विजयासाठी दिलेलं १३९ धावांचं आव्हान भारतीय संघानं १८व्या षटकात केवळ दोन गडी गमावून पूर्ण केलं. दुसऱ्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानच्या संघानं बांग्लादेशवर आठ गडी राखून विजय मिळवला.

**//<><><><><>//**